# Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India

## भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा




Editor

- Dr. Sarjerao Padmakar
- Dr. Haji Nadaf
- Dr. Ranjit Mane

# Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India

## भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा

Editor

**Dr. Sarjerao Padmakar**
**Dr. Haji Nadaf**
**Dr. Ranjit Mane**

Publishers
**L.G. Publication, Kolhapur**

ISBN: 978-81-955177-5-6

**Existing Inheritance of Folk Culture and Oral Traditions in India**
**भारतातील लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरेचा विद्यमान वारसा**

**Sponsored-**
Western Region, Indian Council of Social Science Research (ICSSR), Mumbai

**Editor**
Dr. Sarjerao Padmakar
Dr. Haji Nadaf
Dr. Ranjit Mane

**First Edition:** November, 2023
**Cover Page:** Dr. Haji Nadaf

**Publishers**
L.G. Publication,
Hanuman Nagar, Ujlaiwadi, Near Shivaji University,
Kolhapur

*All rights reserved. This Book or any part thereof may not be reproduced in any form without the written permission of the publisher.*

**Printed by:**
Shreekant Computers,
Daulat Nagar, Kolhapur.

**Rs: 400/-**

***Disclaimer:***
*The Views expressed by the authors in their articles, reviews etc. insight issues are their own. Editor and publisher are not responsible for them. All disputes concerning the book shall be in the court at Peth Vadgaon, Maharashtra.*

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | तात्यासो माळी | लोककला-सोंगी भजन | २०७ |
| ४१ | भारती कोळेकर | महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीच्या उपासकांचा विद्यमान वारसा | २०९ |
| ४२ | डॉ. दिपक वळवी | आदिवासी लोकदैवत कथा | २१४ |
| ४३ | डॉ. अंजली मस्करेन्हस | भारतीय आदिवासींच्या दैवतकथांचा अभ्यास | २१९ |
| ४४ | डॉ. वैजयंती जाधव | लोकसाहित्याचे स्वरूप | २२५ |
| ४५ | डॉ. वनश्री फाळके | बोहाडा: एक आदिवासी नृत्यनाट्य | २३३ |
| ४६ | डॉ. अरूणा वाघमारे | लोकसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती | २३७ |
| ४७ | कविता कुपवाडे | लोककला, स्थानिक ओळख आणि सांस्कृतीक परिणाम | २४२ |
| ४८ | डॉ. खंडेराव शिंदे | ब्रिटिश सत्तेचे कोल्हापूर राज्यातील समाज मनावर झालेला परिणाम प्रतिबिंबित करणारे लोकगीत सन-१८५० | २४६ |
| ४९ | साजिदा आरवाडे | लोकसाहित्य: लोकसंस्कृती, लोककला, लोकगीते, लोककथा | २५० |
| ५० | डॉ. वैशाली चौगुले | लोकजीवनाचा अविभाज्य घटक: म्हणी | २५५ |
| ५१ | प्रा. उदय शिंदे | धार्मिक तीर्थक्षेत्रे, सण, उत्सव आणि लोकपरंपरा | २५८ |
| 52 | Dr. Shubhangi Mane<br>Mr. Digvijay Kumbhar | Current Scenario of Maharashtra's Folk Media & Arts | 250 |
| 53 | Nidhi Katti | Muttagi Narasimha: A Pious Pilgrimage of the Madhwa Community | 265 |
| 54 | Dr. Jayant Ghatage | Lavani: The Folk Culture of Maharashtra | 269 |
| 55 | Dr. H. E. Basavarajappa | Kinnal art in Karnataka | 274 |
| 56 | Dr. Sudarshan Sagat | 'Gondhal' Folk Art and its Significance in Maharashtra | 276 |

# महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीच्या उपासकांचा विद्यमान वारसा

भारती कोळेकर

**प्रस्तावना:** महाराष्ट्र ही जशी संत महंतांची भूमी आहे तशीच ती कलावंतांचीही भूमी आहे. महाराष्ट्रात अगदी प्राचीन काळापासून आजतागायत वासुदेव, गोंधळी, भराडी, बहुरूपी, चित्रकथी, आराधी, भोपे, वाघ्यामुरळी, जागरण, गोंधळ, दशावतार, धनगर, दंडार, डहाक इ. लोककला व त्यांच्या उपासकांच्या माध्यमातून देवीदेवतांची आराधना करत मराठी संस्कृतीचे जतन संवर्धन करताना दिसून येतात. हे कलावंत गावोगावी भटकंती करून मनोरंजनातून प्रबोधन करत आध्यात्मिक आशयातून लोकसंस्कृती तसेच लोकमानसाचे जतन करत  हा वारसा पुढील पिढीकडे संक्रमित करताना दिसतात.

**पोतराज /कडकलक्ष्मी:**

'पोतराज' हा अस्पृश्य समजलेल्या जातीपैकी असून तो गाववेशीवरील मरीआई, लक्ष्मीआई या ग्रामदेवतेचा  उपासक असतो. त्यामुळे त्याला 'मरिआईवाला' किंवा  'लक्ष्मीआईवाला' या नावानेही ओळखले जाते. 'मरीआई' हे दैवत फार कडक असल्याने तिला 'कडकलक्ष्मी' म्हणूनही संबोधतात. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मते, पोतराजाच्या हाती जो कोरडा असतो. त्यास 'कडक' म्हणतात. या भक्ताच्या आयुधाचे हे वैशिष्ट्यच असल्यामुळे ही देवी 'कडूकलक्ष्मी'-'कडकलक्ष्मी' या नावानेही ओळखली जाऊ लागली असावी.[१] कडकलक्ष्मी  हे नाव देवीप्रमाणेच तिच्या भक्ताला-पोतराजालाही वापरले जाते. मरीआई किंवा लक्ष्मीआई या देवतांच्या नावाने त्यास 'भगत' म्हणून सोडले जाते. गावावर येणारी संकटे, अरिष्टांचे निराकरण करणे, प्लेग, पटकी, देवीसारखे रोग पसरू नयेत म्हणून देवीपुढे गाऱ्हाणे घालणे, गावाच्यावतीने मागणे मांडणे इ. कामे तो करत असतो. तो गावाचा मागत्या असतो. दरवर्षी आषाढ महिन्यात कमरेस विविधरंगी वस्त्रे/हिरवे खण – आभरान व घुंगराची माळ, पायात खुळखुळ्या/ पितळी वाळे, गळ्यात बांगड्याची माळ, त्यामध्ये मरीआईचे चांदीचे मुखवटे, कपाळावर कुंकवाचा मळवट, तोंडात विडा, साथीला डफ, ढोलकी, सनईचे सूर असा वेश असून एका हाताने हालगी वाजवत देवीच्या नावाने 'मदान' म्हणजेच भिक्षा मागत असतो. डोक्यावर वाढवलेल्या लांब  केसामुळे त्याचे रूप फारच उग्र व भीतीदायक वाटते. दर मंगळवार, शुक्रवार, अमावस्या, पौर्णिमा व बाजारच्या दिवशी देवीचे मागणे मागायला तो गावभर फिरत असतो. हलगीच्या तालावर देवीची भक्तिगीते, विधीगीते, कथागीते इ. मधून सामाजिक, आध्यात्मिक आशय भावनिकरीत्या प्रकट होत असतो.

परंतु अलीकडच्या काळात हे विधी विरळ होत आहेत. तसेच शिक्षणाने झालेले वैचारिक परिवर्तन, आणि साथीचे रोग दैवी उपायाऐवजी वैद्यकीय उपचाराने व आरोग्यविषयक नियमांचे पालन करून बरे होतात. याची जाणीव झाल्यामुळे पोतराज हा गावदेवरुपी कालबाह्य झालेला आहे आणि स्वाभाविकही आहे. कारण स्त्रियांसारखे केस वाढवून विविधरंगी वस्त्रे अडकवून देवीच्या नावाने भिक्षा मागून गुजराण करणे अशक्य  झाले आहे. विज्ञानयुगात पोतराजाच्या परंपरेला अंधश्रद्धा ठरविले आहे. त्याच्या गीतांमध्ये नीती, चारित्र्य कौटुंबिक सुखदु:खाच्या कथा अशा स्वरूपाचा आशय असला तरी

---

दत्ताजीराव कदम आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, इचलकरंजी.

त्यात स्त्रीत्वाचा भाग कमी आणि रूढी परंपरागत प्रचलीत समाजव्यवस्थेतील अंधश्रद्धा म्हणता येईल असाच आशय अभिव्यक्त झालेला दिसतो. अनेकांनी धर्मांतर केल्यामुळे जेथे जुन्या धारणा टिकून आहेत तेथेही हे विधी आता अभावानेच होताना दिसतात. महाराष्ट्राच्या विविध भागात आजही अनेक पोतराज कार्यक्रम करताना दिसतात. त्यामध्ये हनुमंत पोतराज (नातेपुते), अंकुश पाटोळे (कोल्हापूर), संजय कांबळे (सोलापूर), मनोज भडकवाड (ब्रह्मपुरी), लक्ष्मण पारसे (लवंग सेक्टर) यासह अनेक पोतराज आहेत. आधुनिक आशय, संदर्भ यामध्ये सरकारी कार्यक्रमाच्या अनुषंगाने निर्मल ग्राम, आरोग्य समस्या, हुंडाबळी, विविध सामाजिक प्रश्न असे अनेक विषय पोतराज आपल्या गीतातून मांडताना दिसून येतात.

**वाघ्या-मुरळी:**

गोंधळी, भुत्ये हे जसे देवीचे उपासक तसेच वाघ्या-मुरळी हे खंडोबाचे उपासक. मुंबई इलाख्यातील जातींच्या सर्वेक्षणात दिलेल्या माहितीनुसार, "एखाद्या मनुष्यास मुले होत नसली अथवा त्याची मुले जगत नसली, म्हणजे तो 'मूल जगल्यास तुला अर्पण करीन,' असा नवस खंडोबास करतो अशा त-हेने खंडोबास अर्पण केलेल्या मुलांना 'वाघ्या' म्हणतात. तर मुलींना 'मुरळ्या' म्हणतात. कधी-कधी विवाहित स्त्रियाही नवसाने अथवा 'आपणास खंडोबाची स्त्री होण्याचे स्वप्न पडले असल्याचे सांगून स्वतःला खंडोबास अर्पण करतात.'[१] वाघ्या-मुरळी हे दक्षिण महाराष्ट्रभर आढळतात. मुरळ्यांचे लग्न खंडोबाबरोबर करतात परंतु वाघ्यांच्या मुलामुलींतही लग्न होत असते वाघ्ये हे दोन प्रकारचे असतात. घरवाघ्ये व दारवाघ्ये. घरवाघ्ये म्हणजे नवस फेडण्यासाठी काही वेळ वेश परिधान करून 'वारी' (भिक्षा) मागणारे व केवळ श्रद्धा व्यक्त करणारे. तर दारवाघ्ये म्हणजे कायमची दीक्षा घेतलेले व भिक्षेवर गुजराण करणारे, भक्तांची धार्मिक कृत्ये 'जागरण' करणे व 'लंगर' तोडणे इ. विधी करणारे होत. मुरळ्या वेश्यावृत्तीने व भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. त्यांचा पोशाख नऊवारी साडी, कपाळावर भंडारा, व गळ्यात कवड्यांच्या माळा असतात. उजव्या हातात पदराचे टोक आणि दोन घंट्यांचा जुडगा (घोळ/घाटी) वाजवीत नृत्य करते. एक वाघ्या तिला तुणतुण्याची साथ देतो व दुसरा खंजिरी वाजवून गाणी म्हणत असतो. महाराष्ट्रात वाघ्यांचा विशिष्ट असा वेश नाही परंतु कर्नाटकात मात्र त्यांचा विशिष्ट प्रकारचा वेश असल्याचे दिसून येतो.

आज महाराष्ट्रात अनेक घरात लग्नानंतर जागरण गोंधळाचे विधी होत असल्याने वाघ्या-मुरळीच्या हजारो पार्ट्या कार्यरत आहेत. यात कोमल पाटोळे-मेढापूरकर आघाडीवर आहेत. याशिवाय सुभाष गोरे-सांगोला, अंगद वाघे – वाकवे ही आधुनिक पिढी परंपरागत पद्धतीने जागरण-गोंधळ करताना दिसतात. छगन चौगुले यांनी आपल्या गीतामधून अलीकडच्या काळात नीती, चरित्र शिकवण, प्रबोधन केले आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात आजही ही परंपरा मोठ्या प्रमाणात असल्याचे पहावयास मिळते. वाघ्ये बनण्याची पद्धत अजूनही रूढ आहे. परंतु मुरळी बनण्यास मात्र कायद्याने बंदी घातली आहे.

**वासुदेव:**

सकाळच्या प्रहरी घरोघरी जाऊन भिक्षा मागणारा 'वासुदेव' हा श्रीकृष्णाचा भक्त आहे. श्रीकृष्णाच्या चरित्र गायनाने लोकांचे रंजन करत नीतीची शिकवण देत असतो. चिपळ्या व टाळाच्या तालावर गाणी गाऊन "दान पावलं ऽऽ देवा दान पावलं" अशा शब्दात आनंद व्यक्त करत दान स्वीकारत असतो. डोक्यावर मोरपिसांचा टोप, अंगात शुभ्र घोळदार झगा, कमरेला शेला गुंडाळून

त्यात बासरी खोवलेली असते. 'वासुदेव' हा प्राचीन असल्याचे संदर्भ पाणिनीच्या अष्टाध्यायीत, महानुभाव पंथ, संत वाङ्मयातही आढळतात. तो आपल्या कलेतून, पारंपरिक विविध गीते, आध्यात्मगीते, कथागीते, स्फूट इ. मधून श्रीकृष्ण भक्ती महिमा, प्रपंचनीती, बोधात्मक सामाजिक आशय असणारी व सद्यस्थितीच्या रचना इ. गीते सादर करतो.

**बहुरूपी:**

बहुरुपी हा एक महत्त्वपूर्ण लोककलावंत मानला जातो. याला काही भागात 'रायरंद' असेही म्हणतात. बहुरूपे धारण करणारा तो 'बहुरूपी' असे म्हणता येते. शिपायाची वस्त्रे परिधान करून विनोद करणाऱ्या या कलावंतास समाजात मानाचे स्थान नसले तरी मनोरंजन करण्याचे फार मोठे सामर्थ्य त्याच्या संवादात व अभिनयात दिसून येते. विविध सोंगे सादर करणारा तो एक नट असतो. हुबेहूब नक्कल करण्याचे सामर्थ्य त्याने संपादन केलेले असते. विविध सोंगे घेऊन कथा सांगत, गाणे म्हणत विनोदनिर्मिती करत उदरनिर्वाहासाठी बिदागी मागणे हा त्याचा जीवनक्रम. 'लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला' ही त्याची पारंपरिक प्रसिद्ध लोकप्रिय रचना आजही संपूर्ण महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर मराठी जनमानसात परिचित आहे.

**भराडी:**

मराठी लोकपरंपरेत जागरण- गोंधळाप्रमाणेच 'भराड' या लोकाचाराचाही महत्त्वपूर्ण संबध आहे. भैरवनाथ व जोतिबा या लोकदैवतांचे उपासक म्हणून 'भराडी' ओळखले जातात. ते पारंपरिक गाणी गाऊन भैरवनाथाचे महात्म्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम करत असून ते स्वतःला नाथजोगी समजतात. ते भिक्षा मागताना डमरू (डौर) वाजवीत असल्यामुळे त्यांना 'डवरे गोसावी' असेही म्हणतात. रा. चिं. ढेरे यांच्या संशोधनानुसार 'प्राकृतशब्दमहार्णवा'त 'सिवभवणाहिगरिनणा भरडएण' असा शिवमंदिरातील भराड्यांचा उल्लेख आला आहे.[३] यावरून भराड्यांची परंपरा प्राचीन असल्याचे दिसून येते. भराडी व गोंधळी यांच्या पूजाविधीत साम्य असल्याचे दिसून येते. ते भिक्षेच्यावेळी जशी अनेकविध गाणी गातात तशीच भराडाच्या कार्यक्रमातही गातात. जोतिबा कुलदैवत असणा-यांकडे 'भराडा'चा कुलाचार पाळला जातो. लग्न कार्यापूर्वी, नवरात्रात दररोज भराड करण्याची प्रथा आहे. गोंधळ जागरणाप्रमाणे गण, देवतांना आवाहन, उपास्य देवतेचे स्तुतीपर गीत, कथा निरुपण व शेवटी आरती हा क्रम भराडात पाळला जातो. भराडी लोकांनी पूर्वीपासून तमाशे गाजवल्याचे संदर्भ रा. चिं. ढेरे यांच्या संशोधनात आढळतात. तसेच 'भारतीय संस्कृती कोशात' महादेव शास्त्री जोशी लिहितात, "डौरी लोक दांगटी पोवाडा गात गावोगावी फिरतात. धीमडी व तुणतुणे ही वाद्ये ते वाजवितात. समोर दिसेल त्या प्रसंगावर झटपट पोवाडा रचून म्हणण्या इतके कवित्त्व त्यांच्या अंगी असते.[४]

सिल्लोड, औरंगाबाद, आंबेगाव (पुणे), आंगणेवाडी (कोकण) या ठिकाणी आधुनिक काळातदेखील भराडाचे सादरीकरण केले जाते. विशेषतः झाडी बोली परिसरात नागपूर, विदर्भ या ठिकाणी हे भराड सादर केले जाते. आधुनिक काळात हा लोकाचार नव्या पिढीतही केला जात असल्याचे पहावयास मिळत असले तरी नव्या समाजरचनेत मात्र त्यांचे हे भराडीपण लुप्त होऊ लागले असून तो केवळ ऐतिहासिक कुतूहलाचा विषय होऊ पहात असल्याचे दिसून येते.

**धनगर:**

धनगर ही जमात महाराष्ट्रात भटकंती करत मेंढपाळासाठी प्रसिद्ध आहे. 'बिरोबा' व 'खंडोबा' या त्यांच्या दैवतांची उपासना ते 'सुंबरान' व 'हुईक' अशा दोन भागातील विधींनी करतात. याचे स्वरूप गोंधळ-जागरण सारखेच असते. ढोल, झांज, डफ इ. वाद्यांच्या साथीने तालात बिरोबाच्या निशाणाचा झेंडा घेऊन धनगर मंदिरापर्यंत नाचत जातात. व तेथे 'हुईक' हा भविष्यकथनाचा कार्यक्रम असतो. तेव्हा 'वानाच्या वह्या' सादर केल्या जातात. त्यांचे 'सुंबरान मांडलं सुंबरान मांडलं...' हे सुंबरान/ओव्या/वह्या सादर करताना नृत्य, नाटकाला वाव असून त्यात बिरोबाची स्तुती केली जाते. यावेळेस रात्रभर जागरण करून सुंबरान म्हणजे गा-हाणे गाऊनआख्यान गीते, विधीगीते, पौराणिक आशयाची स्फुट काव्ये, ओव्यांचे सादरीकरण केले जाते.

अलीकडे काही अंशी शिवकाळ, दुष्काळ, सामाजिक विषय, संत बाळूमामाचे महात्म्य धनगरी ओवीगीतातून गाताना दिसतात. हा आधुनिक प्रवाह नव्याने या परंपरेत समाविष्ट झालेला पहावयास मिळतो. धनगर समाजातील उच्चशिक्षित वर्गही आज अभिव्यक्ती, सादरीकरण या आकर्षणापोटी आलेले दिसतात. आजही महाराष्ट्रात धनगरी गीते सादर करणारी मंडळे अस्तित्वात आहेत. आरेवाडी, सांगली, सांगोला, सोलापूर, कोल्हापूर इ. भागात धनगरी ओवीगीतांचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. त्यातून मनोरंजनाबरोबर समाजप्रबोधनही केले जाते.

**आराधी, भोपे, जोगे, जोगतिणी**:

महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तिपीठे असून तिच्या भक्तांची परंपरा फार मोठी आहे. अंबाबाई-महालक्ष्मीचे भगत म्हणजे आराधी, रेणुका-यल्लमाचे भगत म्हणून जन-जोगे, जोगतीणीचा उल्लेख केला जातो. यांची फार प्राचीन अशी गीत गायन परंपरा असल्याचे दिसून येते. या भक्तीगीतातून देवीदेवतांची भक्तीपर, स्तुतीपर कथाकाव्ये, पुराणातील संदर्भावर रचित गाणी गायली जातात. ही गाणी ऐकून भक्ताने बक्षीस दिले तर ते 'तेलाला दिलेली देणगी' म्हणून स्वीकारतात व त्या मोबदल्यात भक्ताच्या नावाने 'पावड' म्हणतात. हे पावड पोवाड्यासारखे असून देणगी देणाऱ्या भक्ताचे नाव त्यात गुंफून त्याच्या कुळाचा उल्लेख त्या गीतात केला जातो.

**समारोप:** एकूणच वरील सर्व लोककला प्रकार हे महाराष्ट्राच्या विविध भागात लोकाचार म्हणून केले जातात. त्यातील बहुरूपी व्यतिरिक्त इतर सर्व कलाप्रकार विधीनाट्य या स्वरूपात मोडतात. बहुजनांचे निखळ मनोरंजन हा उद्देश या लोककलांच्या सादरीकरणात असलेला पहावयास मिळतो. कथागीते, आख्याने, पौराणिक विषय, विधीगीते, नीती, चारित्र्य, इ. शिकवण, नातेसंबध, सामाजिक आशय असे सादरीकरणाचे स्वरूप असते. या कलेच्या सादरीकरणासाठी सांघिक नृत्यप्रकारांना, कलाप्रकारांना आज आधुनिक काळातही मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने नव्या पिढीतील शिक्षित तरुणही यामध्ये सहभागी होताना दिसतात आणि आधुनिक आशय, विषय, संदर्भ ते आपल्या गीतातून, कलेच्या माध्यमातून समाजासमोर ठेवतात. अलीकडच्या काळात या लोककला विधीतील अनिष्ट गोष्टींबाबत पुरोगामी विचारवंतांच्या कार्यामुळे मतपरिवर्तन झाले असून त्यातील अंधश्रद्धा दूर होऊन त्यांना केवळ लोककलांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तसेच या कलावंतांची पुढची पिढी उच्चशिक्षित होऊन विविध अधिकारी पदावर पोहोचल्याने या कला व विधीतील अनिष्ट टाकून काळाला समांतर होऊन समकालीन आशय विषय घेऊन ही कला सदर करतात. त्यामुळे या लोककलांचे प्रवाहीपण सुरु आहे. सांगितिक दृष्टीकोनातून पारंपरिक आणि आधुनिक वाद्यांचा

समन्वय समकालात घातलेला दिसून येतो. त्यामुळे अधिक रंगतदारपणे या लोककलांचे प्रयोग अलीकडच्या काळातही रसिकांच्या पसंतीस उतरलेले दिसतात.

संदर्भ:


1. डॉ. बाबर सरोजिनी, एक होता राजा, 'पोतराजाची गाणी,' पृ. क्र. ४८.
2. 'मुंबई इलाख्यातील जाती', पृ. क्र. १८.
3. ढेरे रा. चिं. , 'लोकसंस्कृतीचे उपासक,' पद्मगंधा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती: २१ जुलै २००७, पृ. क्र. ५५.
4. जोशी महादेवशास्त्री, 'भारतीय संस्कृती कोश' खंड -७ भारतीय संस्कृती मंडळ पुणे, आवृत्ती ३ री, १९९८, पृ. क्र. २३२.